# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२६ / फाल्गुन २१, १९४७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **उप मुख्यमंत्री** | |
| **(३)** | **अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | |
| **(५)** | **अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २८**

---

### पुणे शहरात अन्न व औषध प्रशासन विभागाने खाद्यपदार्थ विक्रेत्यांवर केलेली कारवाई

**(१) * ३०९७९ श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात मागील तीन महिन्यांच्या कालावधीत (माहे एप्रिल ते जून २०२५ दरम्यान) १३ दशलक्ष लोकसंख्येच्या महानगरात केवळ ३० अन्नपदार्थ विक्रेत्यांचीच तपासणी करून ५० नमुने संकलित करण्यात आल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ५० नमुन्यांपैकी बर्फाचे ४, आईस्क्रीम व कुल्फीचे २९, आंब्याचे १२ व शीतपेयाचे ५ नमुने घेण्यात आले असतानाही बहुतांश अहवाल अद्याप प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे शहरातील एफ.सी. रोडवरील "गुडलक कॅफे"चा परवाना 'बन मस्क्यामध्ये काचेचे तुकडे आढळल्याने तात्पुरता रद्द करण्यात आला तसेच कॅम्पमधील एका हॉटेलमधील सूपमध्ये झुरळ आढळूनही कारवाई प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अन्न व औषध प्रशासनाने उपलब्ध करून दिलेल्या टोल-फ्री क्रमांक १८००-२२२-३६५ व "आपले सरकार" पोर्टल व ई-मेलद्वारे दाखल झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशील संबंधिताना उपलब्ध करून दिलेला नाही तसेच अन्न व औषध प्रशासनाचे कार्यालय मोशी येथे असताना कारभार पुण्यातून चालविला जात असल्यामुळे प्रत्यक्ष क्षेत्रीय तपासण्या अपुऱ्या ठरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास,ज्या दोन शीतपेय नमुन्यांवर "खाण्यास अयोग्य/आरोग्यास अपायकारक" असा निष्कर्ष काढण्यात आला, त्याबाबत संबंधित विक्रेत्यांची नावे, ठिकाणे, कारवाईची तारीख व आकारलेला दंड सार्वजनिक न केल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१), (२) हे खरे नाही.

पुणे शहारामध्ये माहे एप्रिल, ते माहे जुन, २०२५ या कालावधीत ११९ अन्न आस्थापनांच्या तपासणी करण्यात आल्या असून ९८ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले आहेत. त्यापैकी बर्फाचा ०१ नमुना विश्लेषणासाठी घेण्यात आला असून सदर नमुना तपासणी अंती प्रमाणीत घोषीत झाला आहे.

आईस्क्रीम व कुल्फीचे एकुण ११ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले होते. त्यापैकी ०८ नमुने प्रमाणीत दर्जाचे व ०३ अन्ननमुने हे कमी दर्जा घोषीत झाले आहेत. सदर कमी दर्जाच्या ०३ नमुन्यांप्रकरणी न्यायनिर्णय प्रकरण दाखल करण्यात येत आहे.

आंब्याचे एकुण ०८ नमुने घेण्यात आले असून सर्व नमुने प्रमाणीत दर्जाचे घोषीत झाले आहेत.

शीतपेयाचे एकुण ०४ नमुने घेण्यात आले होते. त्यापैकी ०२ नमुने प्रमाणीत दर्जाचे व ०२ नमुने लेबलदोष / मिथ्याछाप घोषीत झाले होते. सदर दोन्ही नमुन्यांप्रकरणी न्यायनिर्णय प्रकरण दाखल करण्यात आले आहे.

तसेच, सदर कालावधीमध्ये इतर अन्नपदार्थ जसे की दुध, पनीर, खवा, नमकीन, मिठाई, आटा, बेसन, मैदा, खादयतेल, डाळ, साबुदाना, गुळ पावडर, चहा/कॉफी, तयार अन्न पदार्थ, भाजीपाला, बेकरी पदार्थ इत्यांदीचे एकुण ७४ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले होते. त्यापैकी ५८ नमुने प्रमाणीत दर्जाचे घोषीत झाले आहेत असून १२ अन्न नमुने हे कमी दर्जा/लेबलदोष घोषीत झाले आहेत. ०२ प्रकरणी न्यायनिर्णय अर्ज दाखल झाले असुन उर्वरीत १० नमुन्यांप्रकरणी न्यायनिर्णय अर्ज दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच, ०४ नमुने असुरक्षीत घोषीत झाले असून असुरक्षीत नमुन्यांप्रकरणी न्यायालयात खटला दाखल करण्यात येत आहे.

(३) हे खरे आहे.

दिनांक १०.०७.२०२५ रोजी बन मस्का या अन्न पदार्थामध्ये काचेचा तुकडा आढळुन आल्याबाबतची बाब प्रसार माध्यमामधुन समोर आली होती. त्याअनुषंगाने अन्न व औषध प्रशासनाने दि.११.०७.२०२५ रोजी मे. कॅफे गुडलक रेस्टॉरंट, पुणे या आस्थापनेची सखोल तपासणी करून बटर व बन या अन्नपदार्थाचे नमुने विश्लेषणाकरीता घेतले होते. तपासणीवेळी आस्थापनेमध्ये आढळुन आलेल्या गंभीर त्रुटींच्या अनुषंगे सदर पेढीचा परवाना हा अन्न सुरक्षा व मानके (अन्न व्यवसायांचे परवाना व नोंदणी) नियमन, २०११ चे नियमन २.१.८(४) नुसार दिनांक १२.०७.२०२५ पासुन निलंबित करण्यात आला होता. सदर आस्थापनेने तपासणी मध्ये आढळून आलेल्या त्रुटींची पुर्तता केल्यानंतर दि.२४.०७.२०२५ रोजी सदर आस्थापनेचे परवाना निलंबन आदेश उठविण्यात आले आहेत. सदर प्रकरणी विश्लेषणाकरीता घेण्यात आलेले बटर व बन या अन्न पदार्थाचे नमुने प्रमाणित दर्जाचे घोषीत झाले आहेत.

तसेच, दिनांक ११.०७.२०२५ रोजी लष्कर पोलीस स्टेशन, पुणे यांचेकडुन प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासनाने दि.१२.०७.२०२५ रोजी मे. बिवंडी दरबार, पुणे या आस्थापनेची सखोल तपासणी करुन चिकन सुप या अन्न पदार्थाचा नमुना विश्लेषणाकरीता घेतला होता. तपासणीवेळी आस्थापनेमध्ये आढळुन आलेल्या गंभीर त्रुटींच्या अनुषंगे सदर पेढीचा परवाना हा अन्न सुरक्षा व मानके (अन् व्यवसायांचे परवाना व नोंदणी) नियमन २०११ चे नियमन २.१.८(४) नुसार दिनांक १५.०७.२०२५ पासुन निलंबित करण्यात आला होता. सदर आस्थापनेने तपासणी मध्ये आढळून आलेल्या त्रुटींची पुर्तता केल्यानंतर दि.२५.०७.२०२५ रोजी सदर आस्थापनेचे परवाना निलंबन आदेश उठविण्यात आले आहेत. सदर प्रकरणी विश्लेषणाकरीता घेण्यात आलेले चिकन सुप या अन्न पदार्थाचे नमुने प्रमाणित दर्जाचे घोषीत झाले आहेत.

(४) अन्न व औषध प्रशासनाने उपलब्ध करून दिलेल्या टोल-फ्री क्रमांक १८००-२२२-३६५ तसेच "आपले सरकार" पोर्टल व ई-मेलद्वारे दाखल तक्रारीच्या अनुषंगाने प्रशासना मार्फत वेळीच योग्य ती कार्यवाही करण्यात येवून कार्यवाहीबाबत संबंधितांना कळविण्यात येते. अन्न व औषध प्रशासन, पुणे कार्यालय हे मोशी पिंपरी

चिंचवड या ठिकाणी माहे एप्रिल, २०२३ पासुन कार्यरत असून तेथून अन्न व औषध प्रशासनाचे पुणे जिल्हा व पुणे विभागाचे कामकाज चालते.

(५) हे खरे नाही.

सदर कालावधीत शीतपेयाचे एकुण ०४ नमुने पुणे शहर परिसरामध्ये घेण्यात आले होते. त्यापैकी ०२ नमुने प्रमाणीत दर्जाचे व ०२ नमुने लेबलदोष / मिथ्याछाप घोषीत झाले होते. सदर दोन्ही लेबलदोष/मिथ्याछाप नमुन्या प्रकरणी न्यायनिर्णय प्रकरण दाखल झाले असुन त्याचा न्यायनिर्णय क्रमांक. २३३/२०२५ व २३४/२०२५ असा आहे.

पुणे शहरात माहे एप्रिल, २०२५ ते माहे जानेवारी, २०२६ या कालावधीमध्ये एकूण ६६४ आस्थापनांच्या तपासण्या करण्यात आल्या असून ३९६ आस्थापनांना सुधारणा नोटीस पाठविण्यात आल्या आहेत. त्यापैकी ०३ आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले असून ५३ आस्थापनांविरुध्द तडजोड दाखल करुन रु.७,५९,५००/- दंड वसूल करण्यात आला आहे. सदर कालावधीत विविध अन्नपदार्थांचे एकूण ६६३ अन्ननमुने घेण्यात आले. सदर कालावधीमध्ये घेण्यात आलेल्या ६६३ अन्न नामुन्यापैकी ६०७ नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्राप्त झाले असुन त्यापैकी ५०१ नमुने प्रमाणित आढळुन आले आहेत. तसेच ५२ नमुने कमी दर्जाचे, २३ मिथ्याछाप, व ३१ असुरक्षित घोषित झालेले आहेत. तसेच, ५६ अन्न नमुन्यांचे अहवाल प्रलंबित आहेत. कमी दर्जाच्या / मिथ्याछाप / असुरक्षित नमुन्याप्रकरणी अन्न सुरक्षा मानके कायदा, २००६ अंतर्गत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्याबाबत

**(२) * ३०२७१ श्री.महेश (दादा) किसन लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहराचा झपाट्याने विस्तार होत असून वाढत्या लोकसंख्या व वाहनांच्या संख्येमुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहराला जोडणाऱ्या अहमदनगर-पुणे-कोल्हापूर, पुणे-सातारा-कराड यांसारख्या विविध राष्ट्रीय महामार्गांच्या रुंदीकरणाची व अन्य महत्त्वाची कामे केवळ जमीन संपादनाअभावी जलदगतीने पूर्ण होऊ शकलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रिंग रोड प्रकल्पाची संथ गती आणि उड्डाणपूल व भुयारी मार्गाच्या नियोजित कामांना विलंब होत असल्यामुळे शहरात सातत्याने वाहतूक कोंडी होऊन नागरिकांच्या वेळेचा व इंधनाचा मोठा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) मेट्रो नेटवर्क, बीआरटी मार्गिकांची पुनर्रचना आणि एकात्मिक तिकीट प्रणाली यांसारख्या सार्वजनिक वाहतूक सुधारणांच्या अंमलबजावणीत विलंब होत असल्यामुळे प्रवाशांना नाईलाजाने खाजगी वाहनांचा वापर करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शहरात स्मार्ट ट्रॅफिक सिग्नल, सीसीटीव्ही व आर्टिफिशियल इंटेलिजन्सवर आधारित देखरेख प्रणाली नसल्याने पार्किंग धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्यामुळे वाहतूक नियमांचे उल्लंघन होत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने आगामी २-३ वर्षात वाहतूक सक्षम करण्यासाठी 'सिंगल पॉईंट अथॉरिटी' तयार करणे, ट्रक टर्मिनल व मालवाहतूक केंद्रे शहराबाहेर हलविणे याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

मुंबई-बँगलोर व पुणे-नाशिक पुणे महानगरपालिका हद्दीमधून जाणाऱ्या महामार्गाच्या सेवा रस्त्याचे जमीन संपादनाची कार्यवाही ९० टक्के पूर्ण झालेली आहे.

(३) पुणे इनर रिंग रोड प्रकल्प पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अखत्यारीत असून या करिता आवश्यक जागेचे भूसंपादन प्रगतीपथावर आहे. तसेच पुणे प्राधिकरणामार्फत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकामध्ये मेट्रोसह एकात्मिक महानगर प्रदेश विकास दुमजली उड्डाणपूलाचे बांधकाम प्रगतीत असून, सदर उड्डाणपुलाची औंध - शिवाजीनगर मार्गिका माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वाहतुकीसाठी खुली करण्यात आली आहे व बाणेर ते शिवाजीनगर व शिवाजीनगर ते बाणेर बाजूची उड्डाणपूल मार्गिकेचे संपूर्ण काम पूर्ण झाले असून सदर मार्गिका वाहतुकीसाठी खुली करणे प्रस्तावित आहे.

(४) हे खरे नाही.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमधील ६ बीआरटी मार्गिकांची बस सेवा सुरु आहे. तसेच त्यांची सुधारणा विषयक कामे वेळोवेळी करण्यात येत आहेत.

पुणे महानगरपालिकेतील वाढत्या नागरीकरण व वाहनसंख्येच्या पार्श्वभूमीवर पुणे मेट्रो प्रकल्पाचे विविध टप्पे मंजूर व अंमलबजावणी अंतर्गत आहेत. सध्या पुणे मेट्रो टप्पा-१ अंतर्गत ३३.२८ कि.मी. मार्गिका कार्यान्वित झाल्या आहे.

(५) हे खरे नाही.

पिंपरी चिंचवड शहरामध्ये LED लाईट असलेले ट्रफिक सिग्नल आवश्यक त्या ठिकाणी वाहतूक विभाग पोलीस यांच्या मागणीनुसार बसविण्यात आलेले आहे. तसेच, स्मार्ट सिटी विभागामार्फत आवश्यक ठिकाणी CCTV कॅमेरे वाहतूक विभाग पोलीस यांचे मागणीनुसार बसविण्यात आलेले आहे. त्यांचे कंन्ट्रोल कंमाड सेंटर निगडी या ठिकाणी उभारण्यात आले आहे.

(६) विभागीय आयुक्त, पुणे यांचे दिनांक ३१/०७/२०२५ रोजीच्या बैठकीत तळेगाव एमआयडीसी मध्ये २ विकाणी ट्रक टर्मिनलचे काम अंतिम टप्यात आहे. सदर ठिकाणी ट्रक पार्किंगची व्यवस्था त्वरीत सुरू करण्यात यावी. या व्यतिरिक्त तळेगाव चाकण शिक्रापूर रस्त्यावर भंडारा डोंगर व मौजे बहुळ येथील शासकीय गायरान उपलब्ध आहे. सदरची जागा एमआयडीसीकडे हस्तांतरीत करून समतलीकरण करून पार्किंग योग्य करणे आवश्यक आहे. पार्किंग योग्य झाल्यानंतर सदर ठिकाणी ट्रक पार्किंग सुरू करण्यात येईल.

-----------------

## मुंबईत झोपडपट्टी पुर्नविकास योजनेतंर्गत वरच्या मजल्यावर राहणाऱ्या झोपडीधारकांना पात्र ठरविण्याबाबत

**(३) * २८११९ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात झोपडपट्टी पुर्नविकास योजना राबविण्यात येत असताना अनेक झोपडयांमधील १+१ म्हणजेच वरच्या मजल्यावरील घरात रहात असलेल्या झोपडीधारकाकडे शिधापत्रिका, मतदान ओळखपत्र, विदयुत देयक असे वास्तव्याचे सबळ पुरावे असतानाही झोपडपट्टी पुर्नविकास योजनेत अपात्र ठरविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत राबविण्यात येणाऱ्या उक्त योजनेतील अपात्र ठरलेल्या, वरच्या मजल्यावरील २० टक्के झोपडीधारकांना योजनेच्या लाभापासून वंचित रहावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, वरच्या मजल्यावरील झोपडीधारकांना पात्र ठरवून उक्त योजनेचा लाभ देण्यासाठी अनेक लोकप्रतिनिधीनी शासनाकडे लेखी पत्रव्यवहाराद्वारे मागणी करुनही या झोपडीधारकांना लाभ देण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, १+१ घरामधील वरच्या मजल्यावरील खोलीधारकास योजनेचा लाभ मिळण्याकरिता गलिच्छ वस्ती निर्मुलन व पुनर्विकास अधिनियमात आवश्यक तो बदल करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) प्रचलित शासन धोरणानुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये झोपडीधारकांची पात्रता ठरविताना केवळ तळमजल्यावरील वास्तव्य असलेले झोपडीधारक विचारात घेतले जातात. पहिल्या मजल्यावरील झोपडीधारकांना पात्र करण्याची प्रचलित धोरणामध्ये तरतूद नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौलाना आझाद महामंडळास भागभांडवल उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४) * २८५७२ श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौलाना आझाद महामंडळास ५०० कोटी भागभांडवल उपलब्ध करुन देण्याची घोषणा करुनही अदयाप भाग–भांडवल उपलब्ध झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औरंगाबाद, पुणे व इतर जिल्ह्यात भागभांडवल उपलब्ध न झाल्याने शैक्षणिक कर्जासाठी प्राप्त झालेली विद्यार्थ्यांची शेकडो कर्ज प्रकरणे दाखल करुन गरजूंना तारण मिळकतीवर कर्ज बोजा नोंद करुनही भांडवला अभावी कर्ज रक्कम वितरित झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन भागभांडवल उपलब्ध करुन देण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती सुनेत्रा अजित पवार :** (१) हे खरे नाही,
अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय दि.१४.०२.२०२२ अन्वये महामंडळाचे प्राधिकृत भागभांडवल रुपये ५०० कोटीवरुन रु.७०० कोटी पर्यंत वाढ केली आहे. त्यापैकी महामंडळाच्या स्थापनेपासून फेब्रुवारी, २०२६ पर्यंत रु.६७१.५९ कोटी इतके भागभांडवल महामंडळास अदा केले आहे.
(२) अंशत: खरे आहे,
मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळास शासनाकडून भागभांडवल स्वरुपात प्राप्त होणाऱ्या निधीतून मौलाना आझाद शैक्षणिक कर्ज योजना राबविण्यात येते. सदर योजनेंतर्गत अर्ज केलेल्या सर्व पात्र विद्यार्थ्यांना कर्ज मंजूर करुन वितरीत करण्यात येत आहेत. सद्यास्थितीत सदर योजनेंतर्गत निधी अभावी प्रकरण प्रलंबित नाही.

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या मुदत कर्ज योजना व डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम शैक्षणिक कर्ज योजनेंतर्गत काही प्रकरणे प्रलंबित आहेत. तथापि सदर प्रलंबितता ही महामंडळाच्या भागभांडवल उपलब्धते अभावी नसून राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त निगम, नवी दिल्ली (NMDFC) यांच्याकडून कर्जस्वरुपात प्राप्त होणारा निधी हा मागणीच्या प्रमाणात अपूरा आहे. माहे जानेवारी, २०२६ मध्ये राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त निगम, नवी दिल्ली (NMDFC) कडून रु.१५.०० कोटी इतकी रक्कम कर्ज स्वरुपात प्राप्त झाली आहे. सदर रक्कम वितरीत करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) चालू आर्थिक वर्षासाठी महामंडळासाठी भागभांडवलातील अंशदान म्हणून रु.२५.०० कोटी निधी अर्थसंकल्पीत आहे. सदर निधी वितरीत करण्याची कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यामध्ये शासकीय धान्य गोदामातून धान्याची पोती गहाळ झाल्याबाबत

**(५) * २३५३६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहर व जिल्ह्यामध्ये सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत शासकीय धान्य गोदामातून जिल्हा पुरवठा अधिकारी व संबंधित अधिकारी यांनी सुमारे १५०० ते १३०० पोती धान्य चोरी करून बाहेर बाजारात विक्री केल्याचे दिनांक १७ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर गोरगरीब लाभार्थ्यांचे धान्य चोरी करणाऱ्या जिल्हा पुरवठा अधिकारी व संबंधित अधिकारी यांच्याविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.
नागपूर शहर व नागपूर ग्रामीण भागातील शासकीय धान्य गोदामांमध्ये अशा प्रकारची कोणतीही घटना घडल्याचे तसेच तक्रार प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई म्हाडा मंडळाच्या अखत्यारितील ५६ वसाहतीमधील सहकारी गृहनिर्माण संस्थांना वाढीव सेवा शुल्क लागू केल्याबाबत

**(६) * २४६८२ श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडा मुंबई मंडळाच्या अखत्यारितील ५६ वसाहतीमधील सहकारी गृहनिर्माण संस्थांना कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक म्हाडाकडून वाढीव सेवा शुल्काचा निर्णय घेऊन वाढीव सेवा शुल्क व लागू केलेल्या दंडाच्या रक्कमेचा भरणा करण्याच्या नोटीसा बजावण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयामुळे रहिवाश्यावर आर्थिक संकट निर्माण झाले असून वाढीव सेवा शुल्क माफ करण्यासंदर्भात सन २०२३ मध्ये तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा विद्यमान मुख्यमंत्री यांनी घोषणा केलेली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने सदर वाढीव सेवा शुल्क माफ करण्याबाबत तात्काळ शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा अथवा म्हाडा, मुंबई मंडळाने जबरदस्तीने लागू केलेली दंडाची रक्कम त्वरीत माफ करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मुंबई मंडळाच्या ५६ वसाहतींसाठी सेवाशुल्काच्या वसुलीबाबत शासनाने दि.२२.०३.२०२१ रोजी अभय योजना लागू केलेली होती. तसेच शासनाने दि.१५.१२.२०२३ अन्वये, दि.०१.०४.१९९८ ते दि.३१.०३.२०२१ या कालावधी पर्यंतचे सुधारित दराने आकारण्यात आलेले सेवाशुल्क माफ केलेले आहे. त्यामुळे म्हाडाकडून दि.०१.०४.१९९८ ते दि.३१.०३.२०२१ या कालावधीसाठी जुन्या दराने सेवाशुल्क आकारण्यात येत आहे.

(२) गृहनिर्माण सहकारी संस्थांची परिषद दि.१४.०५.२०२३ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर परिषदेमध्ये तत्का. मा.उपमुख्यमंत्री (गृहनिर्माण) महोदय यांनी केलेल्या घोषणेनुसार वाढीव सेवा शुल्काबाबत शासन पत्र दि.१५.१२.२०२३ अन्वये म्हाडाच्या बृहन्मुंबई मधील ५६ वसाहतीतील संस्थांचे दि.०१.०४.१९९८ ते दि.३१.०३.२०२१ या कालावधी पर्यंतचे सुधारीत दराने आकारण्यात आलेले सेवाशुल्क माफ करुन जुन्या दराने संबंधीत संस्थांकडून सेवा शुल्क आकारण्यात यावे, असे कळविले आहे.

(३) व (४) या संदर्भातील निवेदन अभिलेखावरुन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तथापि, सद्यस्थितीत म्हाडाकडून संबंधीत संस्थाकडे व गाळेधारकांकडे दि.०१.०४.२०२१ नंतरच्या कालावधीसाठी सुधारित सेवाशुल्काची मागणी केली जात आहे. सदरचे सेवाशुल्क हे म्हाडाद्वारे सदर वसाहतींवर त्या त्या आर्थिक वर्षात केलेल्या प्रत्यक्ष खर्चावर अवलंबून आहे. त्यामध्ये म्हाडाद्वारे कोणत्याही प्रकारचा नफा घेण्यात येत नाही.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## मुंबईतील अंधेरी येथील "मोगरा" नाल्याच्या जागेवर अनधिकृतरित्या बांधकाम करण्यात आल्याबाबत

**(७) * ३०९९९ श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड), श्री.राजेश विटेकर (पाथरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील अंधेरी के/वेस्ट विभागाच्या अखत्यारितील सर्वे क्र. ६५, ६६(१), २५१ या भूखंडावरील झोपडपट्टी पुनर्वसन अंतर्गत मिलेनिअर हेरिटेज व अशियाना को. ऑप. हौ. सोसायटी लि. या भूखंडाला लागून असलेल्या मोगरा नाल्याची रुंदी कमी करून नाल्याच्या जागेवर महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांच्या संगनमताने अनधिकृतरित्या टोलेजंग इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकाने या इमारतीचे बांधकाम आराखड्यानुसार केले नसल्याने रुग्णवाहिका व अग्निशमन यंत्रणेस इमारतीपर्यंत पोहचण्याचा मार्ग उपलब्ध होत नसून नाल्यातील पाण्याचा निचरा होत नसल्याने पाण्याचा साठा आजुबाजुच्या परिसरात साठून दुर्गंधी पसरल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, सदर नाल्यामध्ये साचलेल्या पाण्यामुळे १ बालक व १ महिला वाहून त्यांचा मृत्यू झाल्याची गंभीर घटना गेल्या काही महिन्यांपूर्वी घडली असल्याने याबाबत दिनांक २३ जुन, २०२३ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेने मिलेनिअर हेरिटेजच्या विकासकास नोटीस बजावल्यानंतर पुढे कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आर्थिक संगनमतातून या अनधिकृत बांधकामाकडे महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने यासर्व प्रकरणाची पारदर्शक चौकशी करुन अनधिकृतपणे बांधकाम करणाऱ्या उक्त विकासकावर व त्यांना पाठिशी घालणाऱ्या महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) न.भू.क्र. ६५, ६६अ, ६६ (पैकी) १ ते ५१ या भूखंडावर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतंर्गत पुर्नवसनाकरीता ०१ व विक्री घटकाकरीता ०१ अशा प्रस्तावित इमारतींना आराखडा मंजुरीपत्र व बांधकाम परवानगी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याकडून देण्यात आली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पर्जन्य जलवाहिनी विभागाने ब्रीमस्टोवाड मधील अहवालानुसार विषयांकित भूखंडातून जाणाऱ्या मोगरा नाल्याची रुंदी ६.०९ मी. ते ८.५० मी. इतकी दर्शविण्यात आली आहे. सदर नाल्याचे बांधकाम ब्रीमस्टोवाड मध्ये दर्शविलेल्या रुंदीनुसार करण्यात आले असून महानगरपालिकेने मान्यता दिली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिलेल्या मंजूरीनंतर विकासकाने या जागेवर नाल्याच्या क्राँकीट भिंतीचे काम केले आहे. या बांधकामास महानगरपालिकेने भागश: पुर्णत्व प्रमाणपत्र दिले आहे.
(२) सदर ठिकाणी आपत्कालीन सेवा देणाऱ्या रुग्णवाहिका व अग्निशमन यंत्रणेस इमारती पर्यंत पोहोचण्याचा मार्ग उपलब्ध आहे याची खातरजमा केल्यानंतर इमारतीतील स्थापित अग्निप्रतिबंध उपाययोजना व अग्निशमन सुरक्षा यंत्रणा परिपुर्ततेचे पत्र (Letter of Fire Safety Compliance) देण्यात आले आहे.

सदर योजनेतील पुनर्वसन घटकाच्या इमारतीस दिनांक १३ मार्च, २०१७ व २७ मार्च, २०१८ रोजी भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले असून विक्री घटकाच्या इमारतीस दिनांक १३ फेब्रुवारी, २०१७ व १५ जानेवारी, २०२० रोजी भागश: भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे. नाल्यातील पाण्याचा निचरा योग्य ग्रेडियंट असल्यामुळे व्यवस्थित होतो.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील घाटकोपर येथे पोलिसांनी काळया बाजारामध्ये**
**नेण्यात येणारा रेशनधान्याचा साठा जप्त केल्याबाबत**

**(८) * २९०१६ श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत मोठया प्रमाणात ठिकठिकाणी रेशन धान्याचा काळाबाजार सुरु असून घाटकोपर (प.) जागृतीनगर मेट्रो स्थानकाखाली रिक्षातून काळया बाजारात नेण्यात येणाऱ्या रेशनिंगच्या धान्याचा साठा घाटकोपर पोलीसांनी ताब्यात घेतल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मालाची किंमत ८४ हजार ४०० रुपये आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ :** (१) व (२) दि.१९.१२.२०२५ रोजी जागृतीनगर मेट्रो ब्रिज खाली रिक्षातून तांदळाच्या गोण्या अवैधरित्या वाहतूक करत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे संबंधित रिक्षासह एकूण धान्याच्या १२ गोण्या जप्त करण्यात आल्या आहेत. सदर जप्त मुद्देमालाची एकूण किंमत रु.८४,४००/- इतकी आहे.
(३) या प्रकरणी श्री.ताराचंद गुप्ता व इतर दोन अशा तीन व्यक्तींविरुद्ध महाराष्ट्र अन्नधान्य शिधावाटप (व्दितीय) आदेश, १९६६ अन्वये घाटकोपर पोलीस ठाणे येथे एफ.आय.आर.क्र.१४८१/२०२५, दि.२०.१२.२०२५ नोंदविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील चेंबूर येथे शिधावाटप दुकानातील गव्हाची**
**काळया बाजारात होत असलेली विक्री**

**(९) * ३०१०४ श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील चेंबूर येथील शिधावाटप दुकानातील गव्हाचा साठा शिधापत्रिकाधारकांना न देता काळया बाजारात विक्री केल्याची घटना नुकतीच निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी पोलीस प्रशासनाने महिलेसह तिघांवर गुन्हा दाखल करत दोन टेम्पो ताब्यात घेतले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जप्त केलेल्या धान्याची सद्य:स्थिती काय आहे, ते धान्य पुन्हा शिधावाटप दुकानात पुरविण्यात आले आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने धान्य पुरवठा व वितरणात पारदर्शकता आणि शिधापत्रिका धारकांचे हित सुरक्षित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, भविष्यातील अशा प्रकरणांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी शिधावाटप व्यवस्थापन व स्थानिक पोलीस यंत्रणेच्या माध्यमातून काळया बाजारातील धान्यविक्री रोखण्यासंदर्भात कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) व (२) चेंबूर या ठिकाणी बजाज कंपनीचा खाजगी मालकीचा तीन चाकी टेंम्पो हा संशंयितरित्या धान्य घेऊन जात असतांना आढळून आल्याने सदरचा टेंम्पो व धान्य पंचनाम्याअंतर्गत ताब्यात घेण्यात आले आहे. सदरहू प्रकरणी चेंबूर पोलीस ठाणे येथे रास्त भाव दुकानदार महिला व इतर व्यक्तिंविरुद्ध एफ.आय.आर दाखल करण्यात आले आहे.
(३) जप्त धान्य चेंबूर पोलीस ठाणे येथे त्यांच्या ताब्यात आहे.
(४) सदर रास्त भाव दुकानाची तपासणी केली, तसेच गृहभेटी दिल्या असता एकूण १५१ किलो चिजवस्तू कमी आढळून आल्या. त्यानुषंगाने प्राधिकारपत्र धारकाकडून अपहार दंड रु.१०,०००/-, अनामत रक्कत रु.५,०००/-

व अपहारित रक्कम रु.५,२७०/- वसूल करण्यात आला असून चेंबूर पोलीस ठाणे येथे रास्त भाव दुकानदार महिला व इतर व्यक्तींविरुद्ध एफ.आय.आर दाखल करण्यात आला आहे.

धान्य पुरवठा व वितरणात पारदर्शकता आणून शिधापत्रिका धारकांचे हित सुरक्षित करण्यासाठी ई-पॉस मशिनद्वारे बायोमॅट्रीक पद्धतीने ओळख पटवून अन्नधान्य वितरीत करण्यात येते.

(५) अवैधरित्या धान्यविक्री रोखण्याकरीता महाराष्ट्र अन्नधान्य शिधावाटप (व्दितीय) आदेश, १९६६ अंतर्गत संबंधितांवर कार्यवाही करण्यात येते. अधिकृत रास्त भाव दुकान यांची क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून तपासणी करण्यात येते. तसेच गृहभेटी देवून लाभार्थ्यांना शिधाजिन्नस प्राप्त झाले अथवा नाही याची खातरजमा करण्यात येते.

-----------------

## नागपूर-रत्नागिरी महामार्गाच्या कामासाठी पूर्णवेळ प्रकल्प संचालक नेमण्याबाबत

**(१०) * २८८५० श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर-रत्नागिरी या सध्या सुरु असलेल्या महामार्गाच्या कामासाठी पूर्णवेळ प्रकल्प संचालक नेमण्याचे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठ यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला दिनांक २४ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्या सुमारास दिले असल्याचे निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशाची अंमलबजावणी प्राधिकरणाने केली आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) कोल्हापूर रत्नागिरी रा. म. क्र. १६६ हा महामार्ग भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारित येतो. मा. मुंबई उच्च न्यायालय, कोल्हापूर खंडपीठ यांनी दिलेल्या आदेशांचे पालन करून जनहित याचिका क्र. ९७/२०२५ संदर्भात प्रादेशिक अधिकारी, राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI), मुंबई यांच्याकडून प्रतिज्ञापत्र (Affidavit) मा. मुंबई उच्च न्यायालय, कोल्हापूर खंडपीठ यांच्याकडे दाखल करण्यात आले आहे. सदर जनहित याचिकेवरील पुढील सुनावणी प्रगतीत आहे.

सद्यस्थितीत सदर बाब न्यायप्रविष्ठ आहे. न्यायालयीन आदेशास अनुसरून पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## कोकण विभागातील सीबीडी बेलापूर येथील पुरवठा विभागाचे उपायुक्त यांनी लाच घेतल्याबाबत

**(११) * २३२९० श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण विभागातील सीबीडी बेलापूर येथील पुरवठा विभागाचे उपायुक्त श्री.अनिल टाकसाळे यांनी दोन खाजगी इसमांमार्फत तांदूळ विक्रेत्या व्यवसायिकाकडून गुडलक म्हणून ५ लाखांची लाच स्वीकारल्याचे दिनांक १४ डिसेंबर, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणातील फिर्यादींच्या गोडाऊनवर कोकण विभागाच्या पुरवठा उपायुक्तांनी छापा टाकून अवैध तांदूळ साठा दिनांक ३० डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास जप्त केला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तांदूळ व्यवसायिकावर भिवंडी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून या गुन्ह्यात मदत करण्यासाठी, व्यवसाय यापुढे सुरळीत चालू ठेवून भविष्यात कारवाई न करण्यासाठी कोकण विभाग, सीबीडी बेलापूर येथील पुरवठा विभागाचे उपायुक्त श्री. अनिल टाकसाळे यांनी त्यांच्या दोन खाजगी इसमामार्फत सदर व्यावसायिकाकडे पाच लाख रुपये रोख व दरमहा दोन लाख रुपये हप्त्याची मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानुषंगाने संबधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ :** (१) कोकण विभाग, सीबीडी बेलापूर येथील पुरवठा विभागाचे उपआयुक्त श्री.अनिल टाकसाळे यांचेविरूध्द लाच मागितल्या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे येथे तक्रारदार यांनी तक्रार नोंदविली व त्यानुषंगाने दि.१२/०१/२०२६ रोजी ला.प्र.वि.ठाणे यांनी कारवाई करून दि. १३/०१/२०२६ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला.

(२) व (३) दि. ३०/१२/२०२५ रोजी मौजे खर्डी, पायेगाव, भिवंडी, जि.ठाणे येथील गोडाऊन मधील विनापरवाना अवैध तांदूळ आढळून आल्याने पोलीस स्टेशन, भिवंडी येथे एफआयआर नोंदविण्यात आला आहे. तसेच तत्कालीन उपायुक्त (कोकण विभाग) यांनी लाच मागितल्या प्रकरणाच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांचेकडून पुढील तपास सुरु आहे.

(४) श्री.अनिल टाकसाळे, उप आयुक्त (पुरवठा) यांना ला.प्र.विभागाने केलेल्या सापळा कारवाईच्या अनुषंगाने शासनाच्या दि. २६/०२/२०२६ रोजीच्या आदेशान्वये निलंबित केले आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन त्याच्याविरूध्द विभागीय चौकशी सुरू करणे आवश्यक असल्याने शासनाच्या दि. २७/०२/२०२६ रोजीच्या पत्रान्वये त्यांचा विभागीय चौकशीचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त(पुरवठा), कोकण विभाग, नवी मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वरळी येथील सेंच्युरी मिलची जमीन नव्या धोरणानुसार विक्री करण्याचा घेतलेला निर्णय

**(१२)** * **२९९०५ श्री.आदित्य ठाकरे (वरळी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वरळी येथील सेंच्युरी मिलच्या जमिनीचा ४५ ते ५० वर्षाच्या भाडेतत्वावरील करार संपुष्टात आल्यानंतर महापालिकेने सदरहू जमीन ताब्यात घेऊन नव्या धोरणानुसार या जमिनीची विक्री करण्याचा निर्णय मुंबई महापालिकेने घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीन मुंबई महानगरपालिकेच्या मालकीची असतांना कोणतीही निविदा प्रक्रिया न राबविता केवळ प्रशासकीय आदेशाच्या माध्यमातून लिलावात काढल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीनी आयुक्त, बृहन्मुबई महानगरपालिका, मुंबई यांच्याकडे दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी पत्रव्यवहार देखील केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गिरणी कामगार हक्काच्या घरांसाठी सातत्याने मोर्चा, आंदोलन करुन शासनाकडे मागणी करित असताना उक्त जमीनीची कामगारांच्या घरांसाठी असलेली मागणी डावलून केवळ फायदयाकरिता जमिनीची विक्री केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, उक्त प्रकरणी गिरणी कामगारांच्या हक्काच्या घरांकरिता कोणती जमीन निश्चीत करण्यात आली आहे,
(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्यासाठी महानगरपालिकेने वरळी येथील भूकर क्र. १५४६, लोअर परेल विभाग हे भूखंड ३० वर्षे अधिक ३० वर्षांकरिता 'आहे त्या स्थितीत' मक्त्याने (Lease) देण्याबाबत निर्णय घेतला असून याबाबत दिनांक १२ डिसेंबर,२०२५ रोजी महाटेंडर संकेतस्थळावर निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे. निविदा अद्याप अंतिम करण्यात आलेली नाही.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) हे खरे नाही.

सदर भुखंड मक्त्याने (Lease) देण्याबाबत महानगरपालिकेने निर्णय घेतला असून भूकर क्र.१५४६ या भूखंडावरील विद्यमान पात्र रहिवाश्यांचे पुनर्वसन त्याच ठिकाणी किंवा त्याच विभागात निविदाकाराने स्वखर्चाने करण्याबाबतची अट निविदेमध्ये अंतर्भूत करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पणन मंडळ आणि आदिवासी विकास महामंडळाने खरेदी केलेल्या धानाचे चुकारे थकित असल्याबाबत

**(१३) * २७४२२ श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर जिल्हयासह इतर जिल्ह्यातील पणन मंडळ आणि आदिवासी विकास महामंडळाने २ लाख १५ हजार २२६ शेतकऱ्याकडून किमान आधारभूत किंमतीने प्रती क्विंटल २३६९ रुपये दराने ७,३०,१०९,६९ टन धान खरेदी केले असता शेतकऱ्यांचे तब्बल १७२९ कोटी ६२ लाख ९८ हजार ५५६ रुपये थकीत चुकारे असल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महामंडळाने राज्यात नागपूर जिल्हयात किमान आधारभूत दराने ३,४०१ शेतकऱ्यांकडून १३,४६७.५३ टन मका आणि २३४ शेतकऱ्यांकडून ८७९.३२ टन संकरित (हायब्रिड) ज्वारी खरेदी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा मार्केटिंग फेडरेशनच्या (जि.गोंदिया) शासकीय धान खरेदी केंद्रावर धानाची विक्री करणाऱ्या ५२ हजार शेतकऱ्यांचे ४१९ कोटी रुपयाचे चुकारे गेल्या दोन महिन्यापासून थकीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच शासनाकडून दरवर्षी धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदान म्हणून बोनसही यंदा जाहिर करण्यात आला नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त शेतकऱ्यांना त्यांचे थकीत चुकारे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत दि.०६ मार्च, २०२६ अखेर ३,००,८२३ नोंदणीकृत शेतकऱ्यांकडून धान खरेदी करण्यात आले आहे. सदर धानाची खरेदी किंमत रु.२१९६.८२ कोटी इतकी होत असून अभिकर्ता संस्थांना १९६१.५५ कोटी रुपये वर्ग करण्यात आले आहेत. यापैकी रु. १२६१.६५ कोटी चुकारे प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये वितरीत करण्यात आले आहेत. उर्वरित चुकारे अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) पणन हंगाम २०२५-२०२६ मध्ये नागपूर जिल्ह्यात दि.०५ मार्च, २०२६ अखेर ६३१ नोंदणीकृत शेतकऱ्यांपैकी ३३२ शेतकऱ्यांकडून १४९७.९५ मे.टन मका खरेदी करण्यात आला आहे.

नागपूर जिल्ह्यात पणन हंगाम २०२५-२०२६ मध्ये ज्वारी खरेदीसाठी शेतकऱ्यांची नोंद झालेली नसल्याने ज्वारी खरेदी करण्यात आलेली नाही.

(३) गोंदिया जिल्हयात खरीप पणन हंगामात दि.०५ मार्च, २०२६ अखेर एकूण १,०१,१९८ शेतकऱ्यांकडून ३२,९२,०७५ क्विंटल धान खरेदी करण्यात आलेली आहे. धान खरेदी करण्यात आलेल्या ५७,८६४ शेतकऱ्यांना रु.४८६.२ कोटी रक्कम अदा करण्यात आली आहे. उर्वरित चुकारे अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर राशी संदर्भांतील बाब धोरणात्मक आहे. शेतकऱ्यांचे थकित चुकारे अदा करण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावरुन सुरु आहे.

-----------------

## औषधालयांमध्ये डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय प्रतिजैविक औषधांची विक्री होत असल्याबाबत

**(१४) * २४४७७ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विविध औषधालयांमध्ये डॉक्टरांच्या अधिकृत चिठ्ठीशिवाय प्रतिजैविक औषधांची सर्रास विक्री होत असल्याचे माहे डिसेंबर २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय मेडिकल स्टोअरमधून थेट औषधे घेऊन त्यांचे सेवन केल्यामुळे नागरिकांमध्ये 'अँटिमायक्रोबियल रेझिस्टन्स' (AMR) चा धोका वाढत असल्याने भविष्यात औषधांचा प्रभाव कमी होण्याचे गंभीर संकट निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, औषध विक्रीच्या नियमांचे सरळ उल्लंघन करून विना-प्रिस्क्रिप्शन औषध विक्री करणाऱ्या संस्थांवर अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत कठोर देखरेख व कारवाई केली जात नसल्याने अशा बेकायदा कृतींना प्रोत्साहन मिळत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जनतेचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी 'सेल्फ मेडिकेशन' टाळण्यासाठी राज्यातील सर्व औषधालयांमध्ये डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय अँटिबायोटिक औषधांच्या विक्रीवर पूर्णपणे बंदी घालण्याबाबत शासनाने नवीन धोरणात्मक सुधारणा केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वाढता धोका लक्षात घेता राज्यातील औषध विक्रीवर नियंत्रण मिळवण्यासाठी कोणती कार्यवाही व उपायोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व नियम १९४५ अंतर्गत जनतेचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी आणि सेल्फ मेडिकेशन टाळण्यासाठी डॉक्टरांच्या प्रिस्क्रीप्शनशिवाय अँन्टीबायोटीक औषधांच्या विक्रिवर प्रतिबंध करण्यात आले आहेत. त्याअंतर्गत औषध निरीक्षकांद्वारे वेळोवेळी किरकोळ औषध विक्रेत्यांच्या तपासण्या करण्यात येतात. त्यावेळी प्रतिजैविक औषधांची (Antibiotics) व इतर औषधांची विक्री विना प्रिस्क्रीप्शन केली जाते किंवा कसे, ही बाब पडताळण्यात येते.

विना प्रिस्क्रीप्शन अनुसूचीतील औषधांची विक्री केल्या प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाद्वारे माहे एप्रिल, २०२४ ते माहे जानेवारी, २०२६ या कालावधीत खालीलप्रमाणे परवानाधारकांवर कारवाई केली आहे:-

| **कालावधी** | **किरकोळ विक्री पेढयांच्या केलेल्या तपासण्या** | **परवाने निलंबन** | **परवाने रद्द** |
|---|---|---|---|
| एप्रिल २०२४ ते मार्च, २०२५ | १२०२२ | १४८४ | १४२ |
| एप्रिल २०२५ ते जानेवारी, २०२६ | ५६२८ | १०७५ | ९५ |

अँन्टीबायोटीक गटातील औषधे अनुसूची एच व एच-१ गटात मोडतात. एच व एच-१ प्रवर्गातील औषधे ही रजिस्टर्ड मेडीकल प्रॅक्टीशनरच्या चिठठीनेच विकावी, असे परवानाधारक औषध विक्रेत्यास औषधे व सौंदर्य प्रसाधने नियम, १९४५ मधील नियम ६५ अन्वये बंधनकारक आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हज कमिटीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर मुस्लिमेत्तर अधिकारी यांची नियुक्ती केल्याबाबत

**(१५) * ३०९५८ श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या हज कमिटीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर मुस्लिमेत्तर अधिकारी नियुक्त करण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हज यात्रेस कोणत्याही मुस्लिमेत्तर व्यक्तीस जाता येत नसल्याने हज यात्रेच्या प्रथा परंपरा पालन याबाबत विचार केल्यास हज कमिटीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर मुस्लिमेत्तर अधिकारी नियुक्त असणे संयुक्तिक ठरत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मुस्लिम धर्मियांच्या विविध संघटनांकडून हज कमिटीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी मुस्लिम अधिकारी नियुक्त करण्यात यावेत अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,यासंदर्भात शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा अजित पवार :** (१) होय, हे अशंत: खरे आहे.

तथापि, या विभागाचे सह सचिव यांची सदर पदावर नियमित नियुक्ती करण्यात आली नसून त्यांच्याकडे कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती या पदाचा केवळ अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

हज समिती अधिनियम, २००२ मधील कलम २९ नुसार राज्य हज समितीसाठी राज्य शासन उपसचिव दर्जापेक्षा कमी नसेल अशा दर्जाच्या अधिकाऱ्याची व अशी नियुक्त करण्यात येणारी व्यक्ती शक्यतो मुस्लीम असावी, अशी तरतूद आहे. विभागाने केलेल्या विनंतीनुसार सामान्य प्रशासन विभागाने दि.१४.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती या पदासाठी मंत्रालयीन संवर्गाती.ल उपसचिव दर्जाच्या अधिकाऱ्याची इच्छुकता मागविण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. सदर जाहिरातीस अनुसरुन सदर पदाकरिता इच्छुकता प्राप्त न झाल्याने व महाराष्ट्र राज्य हज समितीचे कार्यालयीन कामकाज सुरळीत चालण्यासाठी मुस्लीमेतर अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती या पदावर या पूर्वीही मुस्लीमेतर अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील गोरेगांव-मुलुंड जोड मार्गिकेचे काम महानगरपालिकेने बंदी घातलेल्या ठेकेदारास दिल्याबाबत

**(१६)** * **२६४५९ श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोरेगांव-मुलुंड जोड मार्गिकेचे काम महानगरपालिकेने काळया यादीत समाविष्ट करुन बंदी घातलेल्या ठेकेदार मे.जे.कुमार यांना देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठेकेदारांवर बांधकाम निकृष्ट दर्जाचे केल्या प्रकरणी कारवाई करण्यात आली असून ठेकेदार कोणत्याही प्रकारची सुरक्षेची व पर्यावरणाची काळजी घेत नसल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे तसेच नागरिकांनी विचारणा केली असता ठेकेदारांचे गुंड प्रवृत्तीचे कामगार अर्वाच्च, उध्दट शिवीगाळ करुन मारहाण करीत असल्याचे देखील निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

गोरेगांव मुलुंड जोड रस्ता प्रकल्पा अंतर्गत फिल्मसिटी गोरेगांव ते अमर नगर मुलुंड पर्यंतच्या प्रस्तावित जुळया बोगद्याच्या कामाच्या निविदेतील पात्रता निकषांची पूर्तता केल्यानंतर लघुत्तम निविदाकार मे.जे कुमार-एनसीसी प्रा. लि. यांची कंत्राटदार म्हणून नियुक्ती बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

गोरेगांव-मुलुंड जोड रस्ता प्रकल्पातील दुहेरी बोगदा कामासाठी भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई (IIT, Mumbai) तर्फे संबंधित कंत्राटदाराने सादर केलेले संरचना आराखडे तपासणी करून बांधकाम करण्यात येत

आहे. या व्यतिरिक्त तृतीय पक्ष गुणवत्ता तपासणीस (TPQA) म्हणून व्ही.जे.टी.आय. या संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. दुहेरी बोगदा बांधकामासाठी मे. टिप्सा इंडिया प्रा.लि. या तज्ञ प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची दैनंदिन देखरेख करण्यासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त तृतीय पक्ष प्रयोगशाळेत बांधकाम साहित्याची तपासणी करण्यात येत असून कामाचा दर्जा व गुणवत्ता राखली जात आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वरळी येथील विसावा शासकीय विश्रामगृहाच्या नुतनीकरणाच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(१७) * २३३८१ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वरळी येथील विसावा शासकीय विश्रामगृहाच्या नूतनीकरणाच्या कामादरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून विश्रामगृहातील बेडशीट, उशीचे कव्हर, चादर, पडदे, नॅपकिन आदी साहित्यांच्या धुलाईच्या नावाखाली सुमारे रु.२० लाखांची अनियमित देयक काढल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नूतनीकरणाच्या कालावधीत विश्रामगृहातील कक्षांचा वापर झालेला नसताना देखील नूतनीकरणावेळी पडदे, चादर, बेडशीट, नॅपकिन आदी साहित्य नव्याने खरेदी करण्यात आले असून जुन्या चादर-पडद्यांच्या धुलाईसाठी काढलेल्या लाखो रुपयांच्या देयकांची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे नाही.

तथापि, याबाबत दिनांक २३.०९.२०२५ रोजी वृत्तपत्रामध्ये बातमी प्रकाशित झालेली होती.
(२) हे खरे नाही.

सन २०२२ ते २०२३ या कालावधीत सदर विसावा विश्रामगृहाच्या नुतनीकरणाचे काम हाती घेण्यात येऊन माहे मे, २०२३ मध्ये पुर्ण करण्यात आले व विश्रामगृहाचा वापर १ जुन २०२३ पासून सुरू करण्यात आला आहे. या कालावधीत सदर बाबींवर कोणताही खर्च करण्यात आलेला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील महानगरपालिका शाळांचे खाजगीकरण प्रस्तावित असल्याबाबत

**(१८) * २९२४४ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गरीब, मध्यमवर्गीय आणि सामान्य मुलांसाठी उभी असलेली महापालिका शिक्षणव्यवस्था "वर्ल्ड क्लास"च्या नावाखाली थेट खाजगी संस्थांना देण्याची प्रक्रिया मुंबई महानगरपालिकेने सुरु केली असल्याचे दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाहिल्या टप्प्याला चांगला प्रतिसाद मिळाल्याचा दावा करत ६ शाळांच्या जागा ३० वर्षासाठी सार्वजनिक-खाजगी (पीपीपी) तत्वावर खाजगी व्यवस्थापनाकडे देण्यासाठी निविदा प्रक्रिया काढण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रक्रियेत शुल्क नियंत्रण, प्रवेश प्रक्रिया आणि सामाजिक समावेश याबाबत स्पष्ट हमी दिसत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन शाळांतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक हक्क अबाधित ठेऊन खाजगीकरण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बंद असलेल्या/ कमी क्षमतेने वापरात असलेल्या/ वापरात येऊ न शकणाऱ्या शाळा इमारती/नवीन बांधण्यात आलेल्या/ समायोजित आरक्षणांतर्गत मिळालेल्या इमारती व मोकळे भुखंड शैक्षणिक उपक्रम राबविण्यासाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) तत्वावर शैक्षणिक संस्थाना आरएफपी (Model Request for Proposal and Model Concession Agreement) मागवून शैक्षणिक संस्थांना वितरीत करण्यास महानगरपालिकेने दिनांक २७ मार्च, २०२५ रोजी मान्यता दिली आहे.
(२) अंशत: खरे आहे.
पहिल्या सत्रामध्ये (Phase-१) निविदाद्वारे निवडलेल्या संस्थांना सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) तत्वावर ५ भुखंडांचे वितरण ३० वर्षाच्या कराराद्वारे करण्यात आले आहे.
(३) हे खरे नाही.
सदर निविदा प्रकियेमध्ये शुल्क नियंत्रण, प्रवेश प्रक्रिया, शिक्षण हक्क कायद्याप्रमाणे (RTE) २५ टक्के प्रवेश तसेच महानगरपालिकेला प्राप्त होणारा महसूल (Revenue Sharing) याचा स्पष्ट उल्लेख आहे.
(४) सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) तत्वावर शालेय शिक्षण सुविधांचा विकास झाल्यास महानगरपालिकेवर कोणताही आर्थिक भार न येता शैक्षणिक सेवा प्रभावीपणे दिल्या जातील तसेच शालेय शिक्षण सुविधांची गुणवत्ता, कार्यक्षमता आणि शाश्वतता सुधारण्याचे ध्येय पुर्ण होणार आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील चेंबूर मधील टिळक नगर येथील निसर्ग को-ऑप हौ.सोसायटीने बांधलेल्या अवजड लोखंडी पार्किंग टॉवरबाबत

**(१९) * २५०९८ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील चेंबूर मधील टिळक नगर, येथील निसर्ग को-ऑप हौ. सो. लि. इमारत क्रमांक. ७८ या इमारतीच्या विकासकाकडून गत २ ते ३ वर्षापासून १२ ते १४ मजली अनधिकृत अवजड लोखंडी पार्किंग टॉवरचे काम सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विकासकाने बांधलेल्या उक्त पार्किंग टॉवरमुळे आजुबाजुला दाटीवाटीने उभ्या असलेल्या इतर सोसायट्यांच्या इमारतीतील नागरिकांच्या जिवितास धोका निर्माण झाला असून वित्तहानीही होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापूर्वी आस्मि गार्डन, इमारत क्रमांक. ८० टिळक नगर, चेंबूर या सोसायटीची बांधकाम करण्यासाठी बांधलेल्या इमारतीची तात्पुरती लिफ्ट अचानक समोरच्या इमारतीवर कोसळून तेथील मालमत्तेचे नुकसान झाले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त अनधिकृत लोखंडी टॉवरच्या बांधकामाची तातडीने चौकशी करुन निष्कासित करण्याबाबत अन्य सोसायटयांमधील रहिवाश्यांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त अनधिकृत लोखंडी टॉवरचे बांधकाम निष्कासित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) म्हाडामार्फत दि. २८/०५/२०१९ रोजी दिलेल्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील तरतुदीनुसार मंजूर नकाशाप्रमाणे सदर इमारतीचे लोखंडी कार पार्किंग टॉवर (Automated Mechanize Tower Car Parking System) चे काम प्रगतीपथावर आहे.
(३) व (४) यासंदर्भात स्थानिक नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्याचे अभिलेखावरुन दिसून येत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील मका खरेदी केंद्रांना पुरेशा प्रमाणात गोदाम उपलब्ध करून देण्याबाबत

**(२०) * २३१८३ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शासकीय खरेदीद्वारे मका खरेदीचे उद्दिष्ट ३ लाख १० हजार टन असून त्यासाठी १६४ खरेदी केंद्रांना सन २०२५-२०२६ या कालावधीकरिता मान्यता देण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्य:स्थितीत मका खरेदी केंद्रांना पुरेशा प्रमाणात गोदाम उपलब्ध होत नसल्याने केवळ ६१७८ टन मक्याची शासकीय खरेदी दिनांक १२ जानेवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास झाली असून ६ जिल्ह्यातील खरेदी केंद्रांवर एक किलो देखील मका खरेदी झाला नसल्याचे माहे जानेवारी २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मका खरेदी केंद्रांना पुरेशा प्रमाणात गोदाम उपलब्ध न होण्यामागची तसेच मका खरेदी प्रक्रिया संथगतीने सुरू असण्यामागची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, मका खरेदीसाठी पुरेशा प्रमाणात गोदाम उपलब्ध करून देण्यासाठी आणि मका खरेदीचा वेग वाढविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ :** (१) पणन हंगाम २०२५-२०२६ या कालावधी करीता केंद्र शासनाकडून ६,६०,००० क्विंटल मका खरेदीचे उदिष्ट प्राप्त झाले होते. त्यानंतर केंद्र शासनाकडून अतिरीक्त ५,००,००० क्विंटल मका खरेदीचे उदिष्ट प्राप्त झाले आहे.
(२), (३) व (४) किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत दि.१२ जानेवारी, २०२६ रोजी १० जिल्ह्यातील १९७० इतक्या शेतकऱ्यांकडून ८,०१५.१ मे. टन इतका मका खरेदी करण्यात आला होता.

दिनांक ०५ मार्च, २०२६ अखेर एकून १४ जिल्ह्यांमध्ये १३,६६० शेतकऱ्यांकडून ५६,८३३.१ मे. टन मका खरेदी करण्यात आला आहे.

केंद्र शासनाकडे मका खरेदीसाठी उद्दिष्ट व मुदतवाढ देण्याची विनंती करण्यात आली होती. त्यानुसार केंद्र शासनाकडून राज्य शासनास प्राप्त मका खरेदीचे मूळ उद्दिष्ट ६६,००० मे.टन शिवाय अतिरिक्त ५०,००० मे.टन मका खरेदीचे उद्दिष्ट तसेच मका खरेदी करण्यासाठी दिनांक ३१ मार्च, २०२६ पर्यंत मुदतवाढ प्राप्त झाली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेच्या पाणी पुरवठयाबाबत**

**(२१)** * **२६३५९ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेकडून मुंबईकरांना दरदिवशी तब्बल ४ हजार दशलक्ष लीटर पाणीपुरवठा करण्यात येत असला तरी बहुसंख्य भागातील नागरिकांना आजही पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याचे माहे डिसेंबर २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुनर्विकासाच्या प्रक्रियेत असलेल्या चाळींना अपुरा पाणीपुरवठा, डोंगराळ भागातील वस्त्यांमध्ये पाण्याची तीव्र टंचाई, जीर्ण अथवा विकास कामांदरम्यान जलवाहिन्यांमधून होणारी गळती तसेच पाणी चोरी यांसारख्या कारणांमुळे झोपडपट्ट्या व डोंगराळ भागातील वस्त्यांमधील रहिवाशांना पाण्यासाठी अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) मुंबई महानगरपालिकेकडून दररोज सरासरी ४१०० दशलक्ष लिटर इतका पाणी पुरवठा करण्यात येत असून प्रत्यक्ष मागणी जवळपास ४६६५ दशलक्ष लिटर इतकी आहे. पाण्याच्या मागणीमध्ये वाढ होत असल्याने उपलब्ध पाणी साठ्यामधून पाणी पुरवठा करण्यात येतो.

(२) मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणात जुन्या चाळ इमारती असून अशा इमारतींना जमिनीवरील साठवण टाकीची सुविधा नाही. सदर चाळींना महानगरपालिकेच्या जलवितरण जाळयामधून थेटपणे पाणी पुरवठा केला जातो.

मुंबईमध्ये डोंगराळ भागातील रहिवाशांसाठी महानगरपालिकेमार्फत आवश्यकतेनुसार उदंचन केंद्राद्वारे पाणी पुरवठा केला जातो. तसेच जलवाहिन्यांमधून होणार गळती रोखण्याच्या दृष्टीने महानगरपालिके- मार्फत सन ०१ जानेवारी २०२५ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीमध्ये ११,५४० इतकी गळतीची ठिकाणे शोधून ती बंद करण्यात आली आहेत. तसेच २०२५-२६ या वर्षात जुन्या व जीर्ण झालेल्या एकूण ५८ कि.मी. लांबीच्या जलवाहिन्या बदलण्यात आल्या आहेत. याद्वारे आवश्यक तो पाणी पुरवठा करण्याचा प्रयत्न नियमितपणे केला जातो.

(३) सद्यःस्थितीत जवळपास अंदाजे ५६५ द.ल.लि. इतकी पाणीपुरवठ्याची तूट असून भविष्यातील पाणी पुरवठयाची वाढती मागणी लक्षात घेऊन महानगरपालिकेमार्फत गारगाई धरण ४४० द.ल.लि. व २०० द.ल.लि. क्षमतेचा निक्षारीकरण प्रकल्प हाती घेतला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कापसी (ता.पालम,जि.परभणी) गावात समृध्दी महामार्गाचे काम करणाऱ्या आयआयपीएल इंबीपीएल या खाजगी कंपनीच्या प्रतिनिधीकडून शेतकऱ्यांना त्रास होत असल्याबाबत**

**(२२) * २८४१३ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कापसी (ता.पालम, जि.परभणी) गावात समृध्दी महामार्गाचे काम करणाऱ्या आयआयपीएल इंबीपीएल या खाजगी कंपनीच्या प्रतिनिधीकडून शेतकऱ्यांची पाईपलाईन फोडणे, पारंपारिक रस्ते बंद करणे तसेच कोणतीही परवानगी नसतांना शेतजमिनीवर बेकायदेशीर ड्रिलिंग करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कापसी येथील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडे तक्रार दाखल केली असून संबंधित प्रकरणी गुन्हे दाखल करुन कंपनी व प्रतिनिधींवर कठोर कारवाई करावी व चौकशी पूर्ण होईपर्यंत कंपनीची सर्व कामे तात्काळ स्थगित करावीत अशी मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

जालना-नांदेड समृध्दी महामार्ग मौ.कापसी, ता.पालम, जि.परभणी या गावातून जात नाही.

तथापि, परभणी जिल्ह्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत ७० उपकेंद्राअंतर्गत एकूण ३०४ मेगावॅट क्षमतेपैकी मे.इनटिग्रेटेड इंडक्शन पॉवर लिमिटेड या सौर ऊर्जा विकासकाला एकूण ८ उपकेंद्रातंर्गत ४८ मे वॅट क्षमतेचे सौर प्रकल्प आस्थापित करण्याचे कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

त्यापैकी मौ.कापसी ता.पालम जि.परभणी येथे शासकीय जमिनीवर ४ मे.वॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारणी प्रस्तावित असून, विद्युत वाहिनी उभारण्याचे काम सुरु आहे. तेथील शेतकऱ्यांची पाईप लाईन फुटणे, पारंपारिक रस्ते बंद होण, कोणतीही परवानगी नसतांना शेत जमिनीवर बेकायदेशीर ड्रीलींग करणे अशी कोणतीही कृती सौर ऊर्जा विकासकानी केल्याचे निदर्शनास आलेले नाही तसेच अशी कोणतीही तक्रार महावितरणच्या परभणी येथील क्षेत्रीय कार्यालयाकडे अथवा जिल्हाधिकारी, परभणी यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे महानगर परिवहन महामंडळ यांनी भाडेतत्वावर घेतलेल्या सीएनजी बस खरेदीत झालेला गैरव्यवहार**

**(२३) * २७३६० श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशात सर्वत्र ई-बसचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असताना पुणे महानगर परिवहन महामंडळ मर्यादित यांनी पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्तांना डावलून ५०० सीएनजी बस भाडेतत्त्वावर घेण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू केल्याचे दिनांक २२ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या स्वमालकीच्या १००० सीएनजी बस पीएमयू अंतर्गत १००० ई बसेस ताफ्यात दाखल होणार असतानाही नव्याने ईव्ही बस (इलेक्ट्रिकल बस) कडे न जाता सीएनजीच्या भाडेतत्त्वावर ५०० बस घेण्याचा निर्णयाने पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या संचलन तूट वाढणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, काही महिन्यापूर्वी ४० सीएनजी बस प्रति किलोमीटर ८५ रुपये दराने करार केला असतानाही नव्याने खरेदी केलेल्या ५०० सीएनजी बसेस प्रति किलोमीटर ९०.८१ रुपये दराने करार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर सीएनजी बस करारामध्ये झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहाराची चौकशी त्रयस्थ संस्थेमार्फत करण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही केली तसेच ईव्ही बस भाडेकरारावर घेण्याऐवजी जास्त दराने सीएनजी बस भाडेकरारावर घेण्याऱ्या संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

परिवहन महामंडळामार्फत जीसीसी तत्वावर ५०० नगर सीएनजी, नॉन एसी, बीआरटी, बीएस-६ बसेस ड्रायव्हर व कंडक्टरसह बसेस घेणेची प्रक्रिया राबविण्याकरिता संचालक मंडळाची वित्तीय वर्ष २०२५-२०२६ मधील त्वर्य सभा क्र.४, दि.२०.११.२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वा. आयोजित केल्याबाबत आयुक्त, पुणे महानगरपालिका, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, आयुक्त, पीएमआरडीए, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पीएमपीएमएल, प्रादेशिक परिवहन अधिकारी, डायरेक्टर सीआयआरटी यांना उपस्थित राहण्याबाबत दि.२०.११.२०२५ रोजी ३.०१ मिनिटांनी ईमेलव्दारे कळविण्यात आले होते.

बैठकीकरिता आवश्यक गणपूर्ती पूर्ण होत असल्याने, तथापि, बहुमताची आवश्यकता असल्याने सदर सभेत मान्य ठराव सर्व संचालकांकडे अनुमोदनासाठी पाठविण्यात आला. त्यास संचालक मंडळाने बहुमताने अनुमोदन पाठविले. तसेच संचालक मंडळाच्या निर्णयाचा वृतांत सर्व संचालकांना अवलोकनार्थ व सूचनांसाठी पाठविण्यात आला.

त्यामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्तांना डावलून ५०० सीएनजी बस भाडेतत्वावर घेण्यासाठी निविदा प्रक्रिया केल्याची बाब खरी नाही.

तथापि, दि.०९.०२.२०२६ रोजीच्या ईमेल संदेशाव्दारे मे.वैष्णवी ट्रान्सपोर्ट, मे. ॲन्टोनी रोड ट्रान्सपोर्ट सोल्युशन प्रा.लि., मे. ट्रॅव्हल टाईम मोबेलिटी इंडीया प्रा.लि., मे. श्री. बालाजी रोडलाईन्स व मे. तीरूपती ट्रॅव्हल अँण्ड गुड्स सर्व्हिस प्रा.लि. यांना पुढीलप्रमाणे कळविण्यात आले आहे.

“परिवहन महामंडळाकरिता जीसीसी तत्वावर सीएनजी बसेस ड्रायव्हर व कंडक्टरसह उपलब्धतेकामी आपणास दि.१६.०१.२०२६ रोजी कार्यादेश देण्यात आले आहे. त्या अनुषंगाने आपणांसमवेत करारनामा करण्यात आला आहे. याबाबत संचालक मंडळाची मान्यता आवश्यक आहे. याबाबत विषयपत्र ठेवण्यात येत असून संचालक मंडळाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याबाबत आपणास कळविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.”

अद्याप सदर ५०० बसेसपैकी एकही बस परिचलनात आलेले नाही.

(२) होय हे खरे आहे.

सीएनजी अथवा इलेक्ट्रिक बस ताफ्यात दाखल झाल्यास संचलन तूट वाढणारच आहे. पीएमपीएमएल ही ना नफा ना तोटा या तत्वावर चालणारी सार्वजनिक वाहतुक सेवा देणारी संस्था असल्याने प्रवाशांना माफक दरात सार्वजनिक बस सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. प्रतिदिनी महामंडळाच्या बसेसमधून सुमारे १२ लाख प्रवासी प्रवास करतात.

सन २०२४-२०२५ ची संचलन तूट रू.८८५.४३ कोटी इतकी आहे. सदर ५०० सीएनजी बसेसपासून प्रतिमहा अंदाजित रू.८ कोटी १० लक्ष इतकी संचलन तूट अपेक्षित आहे.

(३) होय हे खरे आहे.

मात्र ४०० सीएनजी बसेबाबतचे दर सन २०२४ मधील आहेत. तसेच ५०० सीएनजी बसेसबाबतचे दर हे सन २०२६ मधील आहेत. त्यामुळे दोन्ही दरांमध्ये एक वर्षापेक्षा जास्त कालावधीचे अंतर आहे.

(४) सदर प्रकरणी पीएमपीएमएल यांच्याकडून सविस्तर अहवाल मागविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि. ठाणे) येथील सप्तशृंगी इमारतीचा स्लॅब कोसळून झालेली जीवितहानी

**(२४) * २४०३४ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण शहरातील (पूर्व) चिकणीपाडा (जि.ठाणे) येथील सप्तशृंगी को.ऑप.हौ. सोसायटी या पाच मजली निवासी इमारतीमधील चौथ्या मजल्यावर फरशी बसविण्याचे काम सुरू असताना चौथ्या मजल्याचा स्लॅब खाली कोसळून ६ व्यक्तीचा मृत्यु होऊन ६ जण जखमी झाल्याचे दिनांक २ मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मृतकांचे कुटुंबीय तसेच जखमींना अर्थसहाय्य प्रदान करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच या घटनेची पुनरावृत्ती घडू नये यादृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

सदर दुर्घटनेत ६ रहीवाश्यांचा मृत्यू झाला होता व ६ रहिवासी जखमी झाले होते. जखमीपैकी उपचारादम्यान एका व्यक्तीचा मृत्यू झालेला आहे. असे एकूण ७ जणांचा मृत्यू झालेला आहे.

(२) सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन दुर्घटनेतील मयत ७ मृतांच्या कुटुंबियांना मा. मुख्यमंत्री सहायता निधी मधून प्रत्येकी रु. ५ लक्ष अशी एकूण रु. ३५ लक्ष इतकी आर्थिक मदत करण्यात आलेली आहे.

सदर घटनेची पुनरावृत्ती होवू नये म्हणून प्रभागातील ३० वर्ष वा त्यापेक्षा जुन्या झालेल्या इमारतींना तात्काळ स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट सादर करणेबाबत एकूण ४५० नोटीस देण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी ७८ स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट प्राप्त झाले आहेत; पैकी ७ इमारती अतिधोकादायक घोषित करण्यात आलेल्या असून त्यापैकी ४ इमारती निष्कासित करण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील अंधेरी सबवे मधील पाणी वाहून जाण्यासाठी पर्जन्य जलवाहिनी टाकण्याचा महानगरपालिकेने घेतलेला निर्णय

**(२५) * २४६८५ श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रत्येक वर्षी अतिरिक्त पाऊस पडल्यावर अंधेरी सबवे जलमय होऊन वाहतुक विस्कळीत होत असल्याने यातून मार्ग काढण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने पाणी वाहून जाण्यासाठी पर्यायी पर्जन्य जलवाहिनी टाकण्याचा घेतलेला निर्णय रद्द करण्यात येऊन त्याऐवजी आता अंधेरी सबवे उड्डाणपूल बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूल बांधण्याचा निर्णय व्यवहार्य आहे की नाही याचा अभ्यास करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे तसेच सल्लागाराने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,
(४) असल्यास, अहवालातील शिफारशींचे स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने सल्लागार नियुक्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) बृहन्मुंबईतील अंधेरी सबवे येथे अंधेरी (पुर्व) व अंधेरी (पश्चिम) यांना जोडणारा उड्डाणपूल उभारण्याचे काम महानगरपालिकेच्या पुल विभागामार्फत करण्यात येत आहे. सदर कामासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने मे.टेक्नोजेम कन्सल्टंट प्रा.लि. यांची तांत्रिक सल्लागार म्हणून नियुक्ती केली आहे. सदर तांत्रिक सल्लागारामार्फत उड्डाणपुलाच्या बांधकामासंदर्भात शक्याशक्यतेची पडताळणी करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणानंतर देशांतर्गत नोकरीचा अनुभव मिळण्यासाठी समान संधी देण्याबाबत**

**(२६) * २४५९५ श्री.धनंजय मुंडे (परळी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येत असून, शिक्षण पूर्ण केल्यानंतर देशांतर्गत नोकरीसाठी आवश्यक असलेला किमान दोन वर्षांचा अनुभव नसल्यामुळे या विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधींपासून वंचित राहावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परदेशी शिक्षण पूर्ण करून परतलेल्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना देशात नोकरीचा अनुभव मिळविण्याची कोणतीही विशेष सवलत, संक्रमण कालावधी (grace period) किंवा पर्यायी व्यवस्था नसल्यामुळे त्यांच्या शिक्षणावर केलेला शासकीय खर्च निष्फळ ठरत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अल्पसंख्याक समुदायातील परदेशी शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना अनुभवाच्या अटीमुळे रोजगार न मिळाल्याने मानसिक ताण, आर्थिक अडचणी व सामाजिक असंतोष निर्माण होत असून, शिष्यवृत्ती योजनेच्या मूळ उद्दिष्टांनाच बाधा पोहोचत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये, शासकीय उपक्रमांमध्ये किंवा खाजगी क्षेत्राशी समन्वय साधून अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिप, अप्रेंटिसशिप किंवा अनुभवधारित विशेष नोकरी योजना राबविण्याबाबत तसेच अल्पसंख्याक समुदायातील परदेशी शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना देशांतर्गत नोकरीचा आवश्यक अनुभव मिळावा यासाठी अनुभवाच्या अटींमध्ये शिथिलता, संक्रमण कालावधी व स्वतंत्र धोरणात्मक सुधारणा करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,
(५) असल्यास, या संपूर्ण प्रकाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती सुनेत्रा अजित पवार :** (१) हे खरे नाही.
(२) लागू होत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) शासनाकडून परदेशातील शिक्षणासाठी भरीव निधी उपलब्ध करुन दिला जातो. विद्यार्थ्यांनी परदेशातून पदव्युत्तर पदवी व पी.एच.डी. चे शिक्षण पूर्ण केल्यानंतर स्वत:च्या कौशल्याच्या आधारे देशांतर्गत नोकरी किंवा स्वयंम रोजगारासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंते व कंत्राटदारांची प्रलंबित देयके अदा करताना जीएसटी कर माफ करण्याची होत असलेली मागणी

**(२७) * ३०९७२ श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सुशिक्षित बेरोजगार अभियंते तसेच कंत्राटदार यांची सुमारे ७८ हजार कोटी रुपयांची देयके सन २०२४ पासून प्रलंबित असून या थकीत देयकांची रक्कम अदा करतेवेळी वस्तु व सेवा कर (जीएसटी) माफ करण्यात यावा अशी रास्त मागणी महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटना यांनी शासनाकडे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) दस्तऐवज आढळून येत नाही.
वस्तु व सेवाकर कायद्यांतर्गत करातील बदल करण्यासाठी शिफारस करण्याचे अधिकार वस्तु व सेवाकर परिषद (GST Council) यांना आहेत. त्यामुळे यावरील कर कमी करण्याचा अधिकार राज्य शासनास नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांतील रुग्णालय व्यवस्थापन माहिती प्रणाली मध्ये त्रुटी असल्याबाबत

**(२८) * २८००० श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या महत्वाच्या रुग्णालयांसोबत सन २०२४-२०२५ पासून २४२ आरोग्य केंद्रांमध्ये ‘रुग्णालय व्यवस्थापन माहिती प्रणाली’ राबवण्यासाठी रेलटेल कार्पोरेशन ऑफ इंडीया लिमीटेड (RailTel Corporation आणि Sterlite Technologies Ltd) आणि स्टर्लाईट टेक्नॉलॉजीस (Sterlite Technologies) या कंपन्यांसोबत ६ वर्षासाठी संयुक्त करार करण्यात आला असल्याचे माहे डिसेंबर २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरपैकी किती आरोग्य केंद्रांमध्ये अद्यापपर्यंत ‘रुग्णालय व्यवस्थापन माहिती प्रणाली’ कार्यरत करण्यात आली आहे,

(३) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या काही महत्वाच्या रुग्णालयांमध्ये सदर ‘रुग्णालय व्यवस्थापन माहिती प्रणाली’मध्ये अनेक त्रुटी निदर्शनास आल्या असून सदर प्रणाली नीट काम करत नसल्याने डॉक्टर आणि रुग्ण दोघांनाही प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रुग्णालय व्यवस्थापन माहिती प्रणालीमधील त्रुटी तात्काळ दूर करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या महत्वाचे रुग्णालय व आरोग्य केंद्रांमध्ये रुग्णालय व्यवस्थापन माहिती प्रणाली राबविण्यासाठी रेलटेल कार्पोरेशन ऑफ इंडीया लिमीटेड (RailTel Corporation of India Limited) आणि स्टर्लाईट टेक्नॉलॉजीस (Sterlite Technologies) या कंपन्यांसोबत दिनांक २२ ऑगस्ट, २०२४ रोजी ६ वर्षासाठी संयुक्त करार करण्यात आला आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेतंर्गत आरोग्य खात्यातील १८८ दवाखाने, २२९ आपला दवाखाने, ९ उपनगरीय रुग्णालये, १ विशेष रुग्णालय (कान-नाक-घसा रुग्णालय) व प्रमुख रुग्णालयांपैकी रा.ए. स्मारक रुग्णालय येथे रेलटेल कार्पोरेशन ऑफ इंडीया लिमीटेड (RailTel Corporation of India Limited) आणि स्टर्लाईट टेक्नॉलॉजीस (Sterlite Technologies) या संयुक्त भागीदारांमार्फत रुग्णालय व्यवस्थापन माहिती प्रणाली कार्यान्वित केली आहे.
(३) हे खरे नाही

सदर प्रणालीमुळे डॉक्टर तसेच रुग्ण यांना सुरवातीच्या वेळेस काही तांत्रिक अडचणी येत आहेत. त्या अडचणीचे त्वरीत RailTel Corporation आणि Sterlite Technologies Ltd यांच्यातर्फे निरसन करण्यात येत आहे. डॉक्टर व रुग्ण यांच्या गरजा लक्षात घेऊन आवश्यक असलेले सर्व सुधारणा व अद्ययावत सुविधा विचारात घेऊन त्या यशस्वीपणे प्रणालीमध्ये समाविष्ट करण्यात येत आहेत.
(४) रुग्णालय व्यवस्थापन माहिती प्रणाली (HMIS) मध्ये तांत्रिक अडचणी उद्भवल्यास तात्काळ प्रतिबंधात्मक व सुधारात्मक उपाययोजना करण्यासाठी सर्व संबंधित रुग्णालयांमधील बाह्यरुग्ण विभाग (OPD) व आंतररुग्ण विभाग (IPD) येथे प्रणालीशी संबंधित कंपनीचे कर्मचारी २४ तास तैनात करण्यात आलेले आहेत. या प्रणालीमध्ये काही आवश्यक सुधारणा करावयाचे झाल्यास त्याबाबत संबंधित कंपनीकडून कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.